# 24. केंद्र - राज्य संबंध
## भाग XI - कलम 245 ते 293

**संघसूची -**

राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचे, ज्यांच्या बाबतीत राष्ट्रस्तरीय एकसमान कायद्याची गरज असते असे विषय.

- पूर्वी 97 विषय होते, आता 98 आहेत पण शेवटच्या विषयाचा क्रमांक अजूनही 97 च आहे.
- आंतरराष्ट्रीय संबंधाशी निगडीत विषय - परराष्ट्र धोरण, UNO संबंधित बाबी, पासपोर्ट, visa, भारताबाहेरील यात्रा, समुद्र/आकाशातील चाचेगिरी इ.
- **संरक्षणविषयक -** लष्कर, आरमार, हवाई दल, हत्यारे, बंदुका, दारूगोळा, स्फोटक द्रव्ये, गुप्त चौकशी खाते इत्यादी.
- **दळणवळण विषयक -** रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, बंदरे, पोस्ट, दीपगृहे, हवाई मार्ग, राष्ट्रीय जलमार्ग, नभोवाणी, टेलिफोन इत्यादी.
- **आर्थिक बाबी -** RBI, चलन, विमा, आंतरराष्ट्रीय व्यापार व वाणिज्य, बँक व्यवसाय, रोखे खरेदी विक्री आणि वायदेबाजार, पेटंट्स, ट्रेडमार्क, संघ/राज्यशासनाने चालवलेली लॉटरी, जनगणना, लेखापरीक्षण, वजन आणि मापे यांची मानके प्रस्थापित करणे, पोस्टाची बचत बँक इत्यादी.

**राज्यसूची -**

**प्रादेशिक व स्थानिक महत्त्वाचे विषय.**

- पूर्वी 66 विषय होते आता 59 आहेत पण शेवटचा क्रमांक अजूनही 66 च आहे.
- **काही महत्त्वाचे विषय -** सार्वजनिक सुव्यवस्था, पोलिस, रेल्वे पोलिस, सार्वजनिक आरोग्य, कारागृहे, मादक पेये, स्मशाने, जुगार, सिनेमागृहे, स्थानिक संस्था, बाजारपेठा, मत्स्यव्यवसाय, हायकोर्टाचे अधिकारी, कालवे, धरणे, पाणीपुरवठा, कृषी गुरांची निगा, इ.

**समवर्ती सूची -**

**या सूचीला पायली संधिप्रकाश क्षेत्र असे म्हणतात.**

- पूर्वी 47 विषय होते आता 52 आहेत पण शेवटचा क्रमांक अजूनही 47 च आहे.
- जोपर्यंत संसद या सूचीतील विषयांवर कायदा करीत नाही, तोपर्यंतच घटकराज्यांना कायदा करण्याचा अधिकार असतो.
- या सूचीतील विषयांवरील, संसदेच्या व राज्यांच्या कायद्यात, संघर्ष किंवा विसंगती निर्माण झाल्यास, संसदेचा कायदा वरचढ ठरतो.
- मात्र राज्याचा कायदा, राष्ट्रपती विचारार्थ, राखून ठेवून त्यास राष्ट्रपतीने संमती दिल्यास, त्या राज्यात राज्य कायदा वरचढ ठरतो. अर्थात संसद पुन्हा त्या विषयावर राज्य कायद्याच्या वरचढ कायदा करु शकते.
- संसद व राज्य कायद्यात, विसंगती नसेल तर दोन्हीही कायदे अंमलात राहतात.
- **विषय -** सामाजिक सुरक्षा व सामाजिक विमा; रोजगार व बेकारी, फौजदारी कायदा, फौजदारी पद्धती, नागरी कायदा, विवाह, शिक्षण, घटस्फोट, दत्तक, मृत्यूपत्रे, अविभक्त कुटुंबवाटणी, वने, कुटुंब नियोजन व लोकसंख्या नियंत्रण, वीज, कामगार कल्याण, ट्रेड युनियन्स, औषधे, वर्तमानपत्रे, पुस्तके व प्रिंटिंग प्रेस, वजन व मापे (यांची मानके प्रस्थापित करणे सोडून)

**आंतर - राज्यीय संबंध**

- **कलम 261 -** संघ व प्रत्येक राज्याच्या सार्वजनिक कृती, अभिलेख व न्यायिक कार्यवाही यांना संपूर्ण भारतीय राज्यक्षेत्रात ful faith & credit दिले जाईल.
- **कलम 262 -** आंतरराज्य नदीजल वाटप / नद्यांच्या खोऱ्यासंदर्भात विवादांचा न्यायनिवडा. संसद कायद्याद्वारे 2 किंवा 2 पेक्षा जास्त राज्यातील नदी वाटपातील वाद-विवाद सोडवेल.

- **भारतातील आतापर्यंतचे जलविवाद न्यायाधीकरण -**

| नदी | स्थापना वर्ष | संबंधित राज्ये |
|---|---|---|
| कृष्णा | 1969 | महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश |
| गोदावरी | 1969 | महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिसा |
| नर्मदा | 1969 | राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र |
| रावी व बियास | 1986 | पंजाब, हरियाणा, राजस्थान |
| कावेरी | 1990 | कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, पुद्दुचेरी |
| कृष्णा द्वितीय | 2004 | महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश |
| वन्सधरा | 2010 | ओडिसा, आंध्रप्रदेश |
| महादयी | 2010 | गोवा, कर्नाटक, महाराष्ट्र |

- **कलम 263 -** आंतरराज्य परिषदेबाबत तरतुदी.
राष्ट्रपतींनी एखादी परिषद स्थापन केल्यास लोकहित साधले जाईल, असे कोणत्याही क्षणी वाटल्यास, ते आदेशाद्वारे अशी परिषद स्थापन करुन तिच्यावर पुढील कर्तव्ये सोपवू शकतात.

अ) राज्याराज्यांमधील तंट्याबाबत चौकशी करणे व त्यावर सल्ला देणे.

ब) काही/सर्व राज्ये, किंवा संघ व एक/अधिक राज्ये यामधील हितसंबंधाच्या विषयाबाबत अन्वेषण व चर्चा करणे इ.

**आंतर-राज्यीय परिषद -**

- सरकारिया आयोगाने कलम 263 अंतर्गत एक कामयस्वरुपी आंतरराज्यीय परिषद स्थापनेची शिफारस केली होती. व्ही.पी. सिंग यांच्या जनता दल सरकारने ही शिफारस मान्य करुन 28 मे 1990 रोजी राष्ट्रपतीच्या अधिसूचनेद्वारे तिची स्थापना केली.
- **रचना - अध्यक्ष,** पंतप्रधान.
- **सदस्य -** सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक व मुख्यमंत्री तसेच प्रधानमंत्री यांच्याकडून नामनिर्देशित 6 कॅबिनेट मंत्री.
- वर्षातून किमान 3 सभा/बैठका होणे अपेक्षित असते.
- सभा पडद्याआड होतात व निर्णय एकमताने/सहमताने घेतले जातात.
- **उद्दिष्ट -** राज्याराज्यांमधील समन्वयास प्रोत्साहन देणे.
- **कार्य -** राज्याराज्यांतील तसेच केंद्र व राज्ये/केंद्रशासित प्रदेश दरम्यानच्या मुद्यांबाबत सल्लागार मंडळ म्हणून कार्य करते.

**विभागीय परिषद -**

- घटनात्मक नसून वैधानिक. निर्मिती - राज्य पुनर्रचना कायदा 1956 अन्वये, 5 विभागीय परिषदा स्थापनेची तरतूद करण्यात आली.
- 1971 मध्ये सहावी उत्तर-पूर्व परिषद स्थापन करण्यात आली.
- **रचना -** प्रत्येक Zonal council मध्ये पुढील सदस्य असतात.

**1) अध्यक्ष** - केंद्रीय गृहमंत्री

**2) उपाध्यक्ष -** राज्यांचे मुख्यमंत्री आळीपाळीने 1 वर्षासाठी काम करतात.

**3) सदस्य -**

1) विभागातील सर्व राज्यांचे मुख्यमंत्री
2) विभागातील प्रत्येक राज्याचे इतर 2 मंत्री
3) विभागातील प्रत्येक केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक.

- **स्वरुप -** चर्चात्मक व सल्लागार स्वरुपाचे असते.
- **कार्ये -**

1) प्रादेशिकवाद, भाषावाद इ. न वाढण्यासाठी प्रयत्न करुन देशाचे भावनिक एकात्मिकरण घडवून आणणे.
2) एकमेकांना मोठे विकास प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यास मदत करणे.
3) देशाच्या विविध प्रदेशांमध्ये राजकीय संतुलन साध्य करणे.

विभागीय परिषदा व त्यांची सदस्य राज्ये व केंद्रशासित प्रदेश -

**1) उत्तर विभागीय परिषद -**

- **कार्यालय -** दिल्ली
- **राज्ये -** जम्मू & काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान, दिल्ली, चंदीगढ.

**2) दक्षिण विभागीय परिषद -**

- **कार्यालय -** चेन्नई
- **राज्ये -** आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू, केरळ, पुदुचेरी

**3) पूर्वीय विभागीय परिषद -**

- **कार्यालय -** कलकत्ता
- **राज्ये** - बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिसा

**4) पश्चिम विभागीय परिषद -**

- **कार्यालय** - मुंबई
- **राज्ये -** महाराष्ट्र, गुजरात, दादरा व नगर हवेली, दमण व दीव

**5) मध्य विभागीय परिषद -**

- **कार्यालय** - अलाहाबाद
- **राज्ये -** उत्तरप्रदेश, उत्तराखंड, छत्तीसगढ, मध्यप्रदेश

**6) उत्तर पूर्वीय विभागीय परिषद -**

- **कार्यालय -** गुवाहाटी
- **राज्ये -** मेघालय, मणिपूर, मिझोराम, नागालँड, अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा, सिक्कीम, आसाम.